**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १५/२०१८-१९ No - 1673 दिनांक: .०७.२०१८ 20 JUL 2018

**आदेश**

**आदेश केस क्र. १५(२०१८-२०१९)**

| | |
|---|---|
| कै. धोंडीराम रामू माळी तर्फे<br>मुलगा श्री दत्तात्रय धोंडीबा माळी<br>मु.पो. कुंभारी ता. जत जि. सांगली | **अर्जदार** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | **पक्षकार** |
| २) कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ | |
| ३) उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभाग जत | |

**कोरम:**-१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

तक्रारदार कै. धोंडीबा रामू माळी यांच्या वतीने त्यांचा मुलगा श्री दत्तात्रय धोंडीबा माळी मु.पो. कुंभारी ता. जत जि. सांगली यांनी सदर गा-हाणे अपिल, त्यांना घरगुती वीज जोडणी त्वरीत मिळणेसाठी दिनांक २८.०५.२०१८ रोजी दाखल केले आहे.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

तक्रारदार यांचे म्हणणे असे की, त्यांनी घरगुती नविन वीज जोडणी मिळणेसाठी रितसर अर्ज वि.प. यांचेकडे सादर करुन नंतर आवश्यक ती रक्कम भरणा केली. परंतु त्यांना वीज जोडणी मिळाली नाही म्हणून त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दिनांक २४.०४.२०१८ च्या आदेशाने ग्राहकाची त्वरीत विज जोडणीची मागणी फेटाळण्यात येत आहे. असा निर्णय दिला. त्याने समाधान झाले नसल्यामुळे या मंचाकडे प्रस्तुत अपिल दाखल केले आहे.

**वि. प. यांची भूमिका.**

तक्रारदार यांनी वरील प्रमाणे दि. ०७.०७.२०१६ रोजी पावती क्र. ८२३११५४ एकूण रक्कम रु. २०००/- व भरणा केली हे वि.प. यांना मान्य आहे. तक्रारदाराचे नाव जत उपविभागीय कार्यालयाच्या प्रतिक्षा यादीत नोंद केले आहे.नियमानुसार त्यांना वीज जोडणी देणेत येत आहे.

घरगुती ग्राहकांचे संगणकीय प्रतिक्षा यादीनुसार त्यांचा जेष्ठता यादीतील क्रमांक ५३६ इतका आहे. सदर प्रतिक्षा यादीपैकी दिनाक ३१.०३.२०१३ पर्यन्तचे ग्राहकांचे विज वाहिनी उभारणी करीता कार्य कंत्राटी आदेश देणेत आले आहे. सदरचा विज पुरवठा यथानुक्रम करणेत येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी दिनांक ११.०७.२०१८ रोजी मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे हजर होते. वि.प. तर्फे प्रभारी उपकार्यकारी अभियंता श्री. पी.आय.राठोड, हे हजर होते. त्यांचे तोंडी युक्तिवाद ऐकणेत आले. उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार घरगुती नवीन वीज जोडणी निश्चित कालावधीत देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?तसेच मागणी केलेली नुकसान भरपाई देणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

## कारणमिमांसा

नविन वीज जोडणी लवकरात लवकर मिळावी व विलंब भरपाई देण्यात यावी अशी विनंती तक्रारदार यांनी मंचासमोर केली आहे. त्यांनी वि.प.कडे रक्कम भरल्यानंतर त्यांना नियमानुसार तीन महिन्यात वीज जोडणी मिळालेली नाही.ही बाब वि.प. नी मान्य केलेली आहे. विलंबाबाबत दिलेल्या कारणाचा हया कामी विचार करता येत नाही कारण ती कारणे, २०१४ च्या विनियम कलम ११.१ च्या बाहेरची आहेत. तक्रारदार यांना वीज पुरवठा करण्यासाठी वर नमूद केल्याप्रमाणे लघुदाब वाहिनीचा विस्तार करावा लागणार आहेत. तक्रारदार यांची नावे प्रतिक्षायादीत विशिष्ट क्रमांकास नोंद आहेत. याबाबत फारसा विचार करता येणार नाही.

कृतीमानके विनियमाप्रमाणे वीज जोडणी देण्यात विलंब झाल्यास भरपाई देण्याची तरतूदही विद्युत नियामक आयोगाने केली आहे. त्यामुळे "प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य" तत्वाचा उपयोग वि.प. यांना करता येत नाही. या केसमध्ये तक्रारदार यांनी त्वरीत विज पुरवठा न मिळाल्याने कृती मानाकंनानुसार नुकसान भरपाईची मागणी केलेली तशी ती देण्यात यावी अशी मागणी श्री खापरे यांनी तक्रारदाराचे वतीने केलेली आहे ती योग्य आहे. असा या मंचाचा निष्कर्ष आहे.

प्रस्तुत तक्रार मयत अर्जदार कै. धोंडीबा रामू माळी यांच्या वतीने त्यांचा मुलगा श्री दत्तात्रय धोंडीबा माळी मु.पो. कुंभारी ता. जत जि. सांगली हयाने दाखल केल्याचे दिसून येते. वि.प. कंपनी तर्फे, मयताच्या नावे दाखल केलेला तक्रार अर्ज कायद्याने चालू शकत नाही व तो खारीज करणेस पात्र आहे असे प्रतिपादन करण्यात आले तथापि मयत धोडीराम याने स्वतः स्वतःकरिता विज जोडणी मागण्याचा अर्ज दाखल केला होता व त्याकरिता आवश्यक रक्कमेचा भरणा देखिल स्वतः केला होता. ही बाब वि.पं. विज वितरण कंपनीने मान्य केलेली आहे. प्रत्येक अर्जदाराला एका विहीत कालावधीतच विज जोडणी मिळण्याचा कायदेशीर हक्क आहे. हा कायद्याचा हक्क मृत्युनंतर त्यांच्या वारसांना बजावता येतो किंवा त्याचा वारसांना तो वारसास प्राप्त होतो आणि ते त्या हक्काने सदरचा हक्क वापरु शकतात. प्रस्तुत प्रकरणी आजतागायत तक्रारदाराला किंवा त्यांच्या वारसाला विज जोडणी देण्यात आली नाही. ही गोष्ट वि.प. विज वितरण कंपनीने मान्य केली आहे. त्यामुळे मयत अर्जदाराचा वारस मुलगा हयाला मयताचा वारस म्हणून व विज जोडणी मिळण्यास हक्क म्हणून अशा दुहेरी नात्याने ही तक्रार दाखल करण्याचा अधिकार आहे. त्यादृष्टीने प्रस्तुत तक्रार चालण्यास कायद्याने कोणतीही अडचण नाही असे या मंचाचे मत आहे.

तक्रार अर्जात नमूद केलेल्या वारसाच्या नावे , इतर वारसदारांचा हक्क अबाधित ठेवून विज जोडणी देण्याचा आदेश करणे हे योग्य व न्यायाचे होईल असा हया मंचाचा निष्कर्ष आहे. यदाकदाचित मयत अर्जदाराच्या वारसांमध्ये विज जोडणी बाबत काही वाद निर्माण झाल्यास तो वाद योग्य त्या दिवाणी न्यायालयात उपस्थित करण्याचा अधिकार त्यांना राहणारच आहे. वारसांच्या हक्कांची चौकशी करण्याचे अधिकार हया मंचाला नाही.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

## आदेश

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे घरगुती नविन वीज जोडणी वि.प. यांनी दि. १०.०८.२०१८ पर्यन्त देऊन वीज पुरवठा चालू करावा असा वि.प. यांना आदेश देणेत येत आहे. तसेच विरुध्द पक्षकाराने दिनांक ०६.१०.२०१६ पासून हया आदेशाचे तारखेपर्यन्त कृती मानके परिशिष्ट "अ" विद्युत पुरवठा( तात्पुरत्या पुरवठयासह) सुरु करणे मधील अ.क्र. ३ नुसार विलंबाच्या प्रत्येक आठवडयाकरता रु.१००/- प्रमाणे एकूण रक्कम रु.९२००/- फक्त भरपाई घ्यावी.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

11/7/18

( पी.एस. पुजारी)
ग्राहक सदस्य

(पी. व्ही. खपली)
सदस्य सचिव

11/7/2018

(ए.व्ही. देशपांडे)
अध्यक्ष

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण